**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०२.०८.२०२६ रविवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे अंबाझरी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.०८.२०२६ चे १२.३५ वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, एक इसम ला—कोकीला बारसमोर, अंबाझरी मेट्रो स्टेशनजवळ संशयीतरित्या दिसल्याने, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सिदधांत उर्फ सिध्दु शिवनाथ भारद्वाज वय १९ वर्षे रा. अजय नगर, अंबाझरी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याने घातलेल्या पॅन्टचे आत कंबरेत एक लोखंडी चाकु मिळून आल्याने आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे अंबाझरी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २८.०७.२०२६ चे ०७.४५ वा. चे सुमारास, फिर्यादीचा मुलगा अर्पण अशोक जिभे, वय २४ वर्षे, रा. प्लॉट क्र. २३९, भाग्यश्री कॉलनी, वार्ड क्र. ५, शितलवाडी, रामटेक जि. नागपूर हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ४० सीडब्ल्यू २४४० ने हिंगणा येथे टयुशन क्लासकरीता पोलीस ठाणे सिताबडी हद्दीत, अलंकार टॉकीज चौक येथून जात असता, चारचाकी वाहन क्र.एम.एच. ०१ सीटी ८३२२ चा चालक नामे गौरव तिडके वय २८ वर्ष रा. नागपूर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मुलाचे मोटर सायकलला धडक मारून, त्यास गंभीर दुखापत केली. गंभीर जखमी मुलास उपचाराकरीता विवेका हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी सौ. स्मिता अशोक जिभे, वय ४४ वर्षे, रा. प्लॉट क्र. २३९, भाग्यश्री कॉलनी, वार्ड क्र. ५, शितलवाडी, रामटेक यांनी दिनांक ०१.०८.२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. मनोहर दंडारे ७२४९७२५८७४ यांनी आरोपी वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१२५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कपीलनगर :—** पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, प्लॉट क्र. ७१, मैत्री कॉलनी, समतानगर येथे दिनेश मेश्राम यांचे नवीन बांधकाम सुरु आहे. तेथे मजुर काम करुन राहणारे फिर्यादी यांचे मजुरांसोबत आधी काम करणारा एक अनोळखी मजुर इसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाचा, त्याचे दुसरीकडील काम बंद असल्याने, दिनांक ३१.०७.२०२६ चे १६.०० वा. तेथे येऊन झोपलेला होता. दिनांक ०१.०८.२०२६ चे ०७.०० वा. चे सुमारास, त्यास उठविले असता, तो बेशुध्द असल्याचे दिसून आल्याने, त्यास उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे

नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे कपीलनगर येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी शंकरलाल राधेलाल पटले वय ३३ वर्ष रा. ह.मु. महादुला कोराडी, नागपूर यांचे सुचनेवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि. जयराम देशमुख यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** हरीष कुंडलिक नेवारे वय ३६ वर्षे, रा. प्लॉट क्र. २०९, आकाश नगर, मानेवाडा रोड, हुडकेश्वर, नागपूर हे दिनांक २०.०७.२०२६ चे १५.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरून पुणे येथे कामाला जातो असे सांगून घरुन गेले होते. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. फोनसुध्दा बंद आहे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांब, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ११ इंच, केस—काळे, अंगात— निळया लायनिंगचा पांढरा शर्ट व काळा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



हरीष

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**